साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–भास्कर कवडुजी घरत
वय ५९ वर्ष, व्यवसाय–नोकरी
राह.डव्हा, तह.उमरेड, जि.नागपुर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत</u>**

**१.** दि.२९/०३/२०२१ रोजी माझी वनमजुर म्हणुन जंगलामध्ये वनपरिक्षेत्र बुट्टीबोरी येथे कार्यरत होतो. त्यावेळी माझ्यासोबत वासुदेव वाघाडे,गोविंदा मानकर व मंसाराम नेव्हारे इं. आम्ही चार लोक होतो. त्यावेळी एक चितळ जंगलातुन बोंबलत जात होतं. त्यावेळी सदर चितळ आरोपीच्या शेताकडे गेले. त्यावेळी कुत्र्यांनी त्या चितळाला पकडले आणि मग त्यांनी मारले. फतरू आणि त्यांचे साथीदार हे दोघेबी चितळाकडे गेले. आम्ही तेथे बसुन असतांना आम्हाला ते मारत असतांना खट खट असा आवाज आला. तसेच आम्ही तिकडे गेलो आणि काय झाले म्हणुन त्यांच्या शेताकडे घुमत होतो. आमच्यासमक्ष अधिका–याने कारवाई केली होती व मोका पंचनामा केला होता. आता मला मोका पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी आहे त्यातील मजकुर खरा खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.०९** देण्यात आला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी आहे त्यातील मजकुर खरा खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.१०** देण्यात आला. आम्हाला घटनास्थळावर पुर्ण चितळ भेटला होता तसेच तेथे कु–हाड,लाठी व सुरा इ. वस्तु होत्या. सदर चितळ,कु–हाड,लाठी व सुरा हे आरोपीच्या शेतात होते. त्यानंतर सदर वस्तु जप्त करून आरोपींना अटक केली होती. मी आरोपींना ओळखतो. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत ते तेच आहे. मी १९८७ पासुन वनखात्यात वनमजुर आहे. मी आजरोजीसुध्दा वनमजुर म्हणुन कार्यरत आहे. मी आरोपींना ओळखतो कारण मी आरोपींना जाग्यावर पाहिलेले आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>सर्व आरोपीतर्फे ॲड.श्री.एस.जी.खानोरकर यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

**३.** मी डव्हा येथे राहतो व माझी ड्युटी चारगाव राउंड सुराबर्डी बिट येथे होती. माझ्या ड्युटीला ब्रेक नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणी चितळ पडले होते त्या

ठिकाणी तार लागलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी चितळ पडले होते त्या ठिकाणी जंगल होते. हे म्हणणे खरे आहे की, जे लोक जागलीवर जातात ते लोक कु–हाड घेउन जातात. हे म्हणणे खरे आहे की,आरोपीचे शेत जंगलाला लागुनच आहे.

**प्रश्न–** ज्यावेळेस तुम्ही हरिण पाहिले त्या वेळेस त्याच्या मागे कुत्रे लागले होते काय?

**उत्तर–**नाही. कुत्रे शेतात होते.

हे म्हणणे खरे आहे की,ज्यावेळेस मी हरिण पाहिले त्यावेळी त्याच्या नाकातुन व डोळ्यातुन रक्त येत होते. हे म्हणणे खरे आहे की,आम्ही लपुन बसलेलो होतो व ज्यावेळेस हरणाजवळ शेतात गेलो त्यावेळेस हरण मरून पडलेले होते. हे म्हणणे खरे आहे की,ज्यावेळेस मी हरिण पाहिले त्यावेळेस त्याच्या पायाला कुत्र्याने तोडल्याचे मला दिसुन आले होते. हे म्हणणे खरे नाही की, जी कु–हाड जप्त केली होती तिला रक्त नव्हते. कु–हाड ही फतरू बोंडे यांच्याकडुन जप्त केली होती व त्याचे नाव पंचनाम्यामध्ये लिहिले होते. हे म्हणणे खरे आहे की,ज्या ठिकाणी हरिण पडलेले होते त्या ठिकाणी रक्त सांडलेले होते. हे म्हणणे खरे आहे की,सदर हरणाला त्यावेळी माती,गवत लागलेले होते व तशी नोंद पंचनाम्यामध्ये केली होती. हे माझ्या लक्षात नाही की, ज्या ठिकाणी हरिण पडले होते त्या ठिकाणी रक्त सांडल्याबाबत नोंद पंचनाम्यात केली आहे किंवा कसे. पंचनामा हा सकाळी शेतात मोक्यावर केला होता त्यावेळी आठ वाजले असतील. घटना ही रात्री १२.०० वाजेची आहे.

**प्रश्न–**सदर हरण हे कुत्र्याने मारले होते काय?

**उत्तर–**नाही. आरोपीने मारले होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी आम्ही लपुन बसलो होतो त्या ठिकाणापासुन सदर हरिण हे बरेच अंतरावर होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी सदर हरिण पडले होते त्या ठिकाणी आजुबाजुला झाडेझुडुपे होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही ज्या ठिकणी लपुन बसलेलो होतो त्या ठिकाणी झाडे झुडुपे असल्यामुळे ज्या ठिकाणी हरिण होते ते आम्हाला दिसत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी अंधार होता. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत काहीच माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, जो मी हरिण शब्द म्हणुन सांगितले आहे तो शब्द चितळाबद्दलचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, हरिण व चितळ एकाच जातीचे असतात. माझे बयाण वनरक्षक धुर्वे यांनी घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्ये नोकरीला असल्यामुळे मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे. मी घटनास्थळ पंचनाम्यावर सही केलेली आहे. किती

लोकांनी पंचनाम्यावर सह्या केल्या हे मला आजरोजी सांगता येत नाही.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि २१.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड